पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष १ ले • अंक : ४ • डिसेंबर २००७ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## पुणे मनपाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव



मा.श्री. माल्कम टनर, अध्यक्ष, वर्ल्ड लिडरशिप फोरम यांच्या हस्ते मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे व मा. श्री. प्रशांत वाघमारे, नगर अभियंता, पुणे मनपा यांना लंडन येथे पुरस्कार प्रदान करताना समवेत मा. किशोर मोरे, उप आयुक्त व श्री. विनोद क्षीरसागर, अभियंता

पुणे महानगरपालिकेच्या ॲटो डी.सी.आर. प्रणालीस लंडन येथील वर्ल्ड लिडरशिप ॲवॉर्डच्या अंतिम फेरीसाठी निवड झाली. सदरची अंतिम फेरी दिनांक ५ डिसेंबर,२००७ रोजी पार पडली. सदर प्रणालीचा आर्किटेक्टर ॲन्ड सिव्हील इंजिनिअरिंग या कॅटेगरी मध्ये समावेश करण्यात आला होता. अंतिम फेरीसाठी एकूण ३ देशांची निवड करण्यात आली. १) लॉस एंजल्स - अमेरीका, २) लॅगॉस - नायझेरीया व ३) पुणे - भारत

या तीन देशांच्या प्रणालींची अंतिम फेरी लंडन येथील इंटर कॉन्टीनेंटल येथे झाली व यामध्ये पुणे महापालिकेने विकसित केलेल्या ॲटो डी.सी.आर. या प्रणालीला प्रथम पारितोषिक मिळाले. सदरचे पारितोषिक मा.श्री.माल्कम टनर, अध्यक्ष,वर्ल्ड लिडरशिप फोरम यांचे हस्ते मा.सौ.राजलक्ष्मी भोसले, महापौर,पुणे व मा.श्री.प्रशांत वाघमारे,नगर अभियंता,पुणे मनपा यांना दिनांक ६.१२.२००७ रोजी सायंकाळी एका शानदार समारंभात लंडन येथे प्रदान करण्यात आले. यावेळी मा.श्री.किशोर मोरे, उप आयुक्त (ज), मा.श्री.अंबरिश गालिंदे, सह महापालिका आयुक्त (मुख्यलेखापाल ) व श्री.विनोद क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता, नगर अभियंता कार्यालय हे उपस्थित होते.

पुणे महानगरपालिकेत सन २००५ मध्ये ॲटो डी.सी.आर. प्रणाली कार्यान्वित झाली. यापूर्वी बांधकाम विभागामध्ये व्यक्तिगत (मॅन्युअल) पातळीवर नकाशांची छाननी होत होती. त्यामुळे नकाशे मान्य होण्यास जास्त कालावधी लागत होता.

नकाशांच्या छाननीमध्ये उद्‌भवणाऱ्या त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने पुणे महापालिकेच्या नगर अभियंता कार्यालयाने सतत परिश्रम घेवून ॲटो डी.सी.आर. ही संगणक प्रणाली

पान ३ वर..

## मृत सेवकांच्या वारसांना आर्थिक मदतीमध्ये वाढ

कामगार कल्याण निधी योजनेमार्फत कामगार कल्याण निधीचे सभासद असलेल्या मनपा अधिकारी/सेवकांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसांना रूपये १५,०००/- चे अर्थसहाय्य तातडीने देण्यात येत होते. मा.स्थायी समिती ठराव क्र.११९९, दिनांक २७.११.२००७ अन्वये वरील अर्थसहाय्याशिवाय अतिरिक्त अर्थसहाय्य रक्कम रूपये ३५,०००/- मृत सेवकांच्या वारसांना देण्याचा निर्णय झालेला आहे. यामुळे वरील मान्यतेनुसार दुर्दैवाने सेवकाचा कोणत्याही कारणास्तव मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसास एकूण रूपये ५०,०००/- चे अर्थसहाय्य यापुढे मिळू शकेल.

•••

## क्रिकेटमध्ये मनपा टीमचे सुयश

पुणे जिल्हा आंतर कचेरी संघटनेतर्फे आंतरकचेरी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन ॲम्युनेशन फॅक्टरी खडकी येथील ग्राउंडवर दिनांक ८/१२/२००७ पासून करण्यात आलेले आहे. पुणे मनपाच्या क्रिकेट टिमने या स्पर्धेमध्ये प्रवेश घेतला आहे. पुणे पोलिस यांच्याविरुध्द झालेली क्रिकेट मॅच प्रथम जिंकली आहे. दिनांक २४/१२/२००७ रोजी सेंट्रल रेल्वे व मनपा यांच्यात झालेल्या मॅचमध्ये विशेष यश संपादन करुन मॅच जिंकली आहे. मनपा टिमने ३६ ओव्हर्समध्ये ७ विकेट गमावून २५९ रन केले तर सेंट्रल रेल्वेची टिम २४.५ ओव्हर्समध्ये सर्वबाद केवळ १११ धावा करु शकली. मनपा टिममध्ये कं. जितेंद्र बागी यांनी ४५ रन व २ विकेट, घनशाम मुलतानी यांनी ३९ रन, कृष्णा बगाडे यांनी ३७ रन व लक्ष्मीकांत शिंदे यांनी ३६ रन व ५ विकेट घेतल्याने मनपा टिमला विजय संपादन करता आला. मनपा टिम आता साखळी स्पर्धेतून बाद स्पर्धेमध्ये पोहोचली आहे. मनपा टीमला पुढील मॅचेससाठी हार्दिक शुभेच्छा.

## संयुक्त राष्ट्रसंघाकडून २००८ आंतरराष्ट्रीय स्वच्छता वर्ष घोषित

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेतर्फे वर्ष २००८ हे आंतरराष्ट्रीय स्वच्छता वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. आरोग्य प्रतिष्ठा व विकास ही स्वच्छतेच्या पायावरच आधारित आहे. या दृष्टिकोनातून जगभर जाणीव, जागृतीबरोबरच स्वच्छतेसाठी बांधिलकीची भावना वाढीस लावणे, निरनिराळ्या देशांमधील केंद्र, राज्य व स्थानिक पातळीवरील शासनाला यासाठी कार्यप्रवण करणे, स्वच्छतेसाठी त्या त्या ठिकाणच्या मागणीनुसार चिरकाळ टिकणाऱ्या व पारंपारिक उपाययोजनांना प्रोत्साहन देणे, या कामासाठी आर्थिक तरतूद, संस्थात्मक व जनतेच्या पातळीवर कार्यशीलता वाढविणे, तसेच स्वच्छतेबाबत शिक्षण या पैलूंवर आधारित कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. यात महिलांची भूमिका महत्वाची असेल.

पुणे महानगरपालिकेने स्वच्छतेच्या दृष्टीने अनेक उपक्रम सुरु केलेले आहेत. यामध्ये ओल्या सुक्या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी प्रशिक्षण व आवाहन सातत्याने करण्यात येत आहे. संत गाडगेमहाराज स्वच्छता अभियानांतर्गत दरवर्षी क्षेत्रीय कार्यालयांना त्यांनी केलल्या विशेष कामगिरीप्रित्यर्थ प्रथम, द्वितीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या आंतरराष्ट्रीय स्वच्छता वर्षानिमित्त निश्चित केलेल्या कार्यक्रमांतर्गत मनपाकडून वर्षभर विविध उपक्रम सुरु केले जाणार आहेत.

### नूतन वर्ष-२००८

### हार्दिक शुभेच्छा !

**नूतन वर्ष सर्वांना आनंदाचे, समाधानाचे व समृध्दीचे जावो.**

**संपादक**

## कामगार प्रशिक्षण वर्गाची शैक्षणिक सहल प्रथमच विमानातून



कामगार प्रशिक्षण वर्गाच्या शैक्षणिक सहलीला
मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे निरोप देताना समवेत महिला प्रशिक्षणार्थी

सल्लागार (कामगार) कार्यालयाकडून आयोजित केलेल्या कामगार प्रशिक्षण वर्ग क्र.६९ व ७० ची शैक्षणिक सहल श्री.अरूण खिलारी,कामगार कल्याणाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २९/११/२००७ ते ९/१२/२००७ अशी १० दिवसांची आयोजित केली होती. वर्ग क्र.६९ हा चतुर्थश्रेणी सेवकांसाठी व वर्ग क्र.७० हा तृतीयश्रेणी सेवकांसाठी घेण्यात आला होता. वर्ग क्र.६९ मध्ये २८ सेवक तर वर्ग क्र.७० मध्ये ३२ सेवक सहभागी झाले होते. या संयुक्त वर्गामध्ये एकूण ६० सेवक त्यामध्ये ११ महिला सेवक होत्या. या वर्गाबरोबर श्री.श्रीकृष्ण घरडे व श्रीमती उषा आल्हाट हे दोन वर्गशिक्षक होते. या सहलीमध्ये बेंगलोर, म्हैसूर, मदुराई, कोडाई कॅनॉल, रामेश्वरम, कन्याकुमारी, त्रिवेंद्रम अशा शहरांना भेटी दिल्या.

सेवकांना विमान प्रवासाचा अनुभव नसल्याने सेवकांच्या मागणीनुसार पुणे ते बेंगलोर हा प्रवास सर्व सेवकांनी स्वखर्चाने विमानाने केला. कामगार प्रशिक्षण वर्गाच्या इतिहासातील विमान प्रवास झालेली ही पहिलीच सहल आहे. मा.राजलक्ष्मी भोसले, महापौर,पुणे यांनी मनपा भवन येथील हिरवळीवर स्वत: येवून सेवकांच्या शैक्षणिक सहलीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मा.महापौर यांनी आपल्या छोट्या मनोगतात सेवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, तुम्ही पुणे

पान ३ वर..

संपादकीय...

## क्वॉलिटी सर्कल अर्थात गुणवत्ता मंडळ

क्वॉलिटी (दर्जा) हा शब्द सर्वत्र परिचित आहे. परंतु क्वॉलिटी सर्कल (गुणवत्ता मंडळ) हा शब्द मात्र फारसा परिचित नाही. सन १९५० मध्ये डॉ.ई.डेमिंग व डॉ.जोसेफ जुरान या सांख्यिकी शास्त्र व क्वॉलिटी शास्त्रातील अमेरिकन तज्ञ व्यक्तिंनी जपानी अधिकारी/सेवकांचे व्यक्तिनिहाय गुण, कामावरील निष्ठा, चिकाटी इ. वैशिष्ट्यपूर्ण गुण लक्षात घेवून क्वॉलिटी संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. उत्पादीत वस्तूंना व देण्यात येणाऱ्या सेवांना दर्जा नसेल तर बाजारपेठेच्या स्पर्धेत कोणताच व्यवसाय व संस्थाना टिकून राहता येणार नाही. पुढे क्वॉलिटी कंट्रोल बरोबर क्वॉलिटी सर्कल ही संकल्पना जपानने १९६२ मध्ये राबविली. या संकल्पनेमुळे जपान आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उच्चत्तम स्तरावर जावून पोहचला.

जपान व भारतीय संस्कृती मध्ये बरेच साम्य आहे. भारतामध्ये एप्रिल १९८२ मध्ये क्वॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाची सिकंदराबाद, हैदराबाद येथे स्थापना झाली आणि भारत हेवी इलेक्ट्रीकल लि.,सिकंदराबाद या संस्थेमध्ये भारतातील पहिले क्वॉलिटी सर्कल अस्तित्वात आले. भारतीय क्वॉलिटी सर्कल या संकल्पनेमागे जपानी तत्वज्ञान आहे, असे सांगता येईल, कारण संस्थेतील अगदी खालच्या स्तरापर्यंतच्या सर्व व्यक्तिंना उच्च दर्जा वा सन्मान देणे, त्यांच्यातील सुप्तावस्थेमध्ये असलेला अव्यक्त बुध्दीसामर्थ्याला चालना देवून जाहीर मान्यता देणे त्याचबरोबर त्यांच्या योग्य व वैशिष्ठपूर्ण संशोधन गुणांना वाव देण्यासाठी भरपूर सुसंधी आणि आवश्यक मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.

क्वॉलिटी सर्कलला मराठीमध्ये गुणवत्ता मंडळ असे म्हटले जाते. परंतु क्वॉलिटी सर्कल हा शब्द मराठी मध्ये रूढ होवून रूजला आहे. क्वॉलिटी सर्कलची क्रांतीकारक संकल्पना संस्थेतील व्यक्तींच्या सक्रीय सहभागातून पुढे आली. क्वॉलिटी सर्कलचे उद्दिष्टच सहभागातून समृद्धीकडे असे आहे. सर्वोत्कृष्टतेकडे वाटचाल करणारी संस्कृती निर्माण करण्याचा क्वॉलिटी सर्कल मध्ये सातत्याने प्रयत्न केला जातो. क्वॉलिटी सर्कल म्हणजे एकाच विभागात काम करणाऱ्या व्यक्तींचा कार्यगट की, जो स्वेच्छेने व नियमितपणे एकत्र जमतो. आपल्या कामासंबंधीत समस्यांची यादी करून त्यातून एक समस्या निवडतो. निवडलेल्या समस्येसंबंधी सर्व महिती स्वत:हून गोळा करतो. त्या माहितीचे शास्त्रशुद्ध पद्धतीने पृथ:करण करून, कार्यगटातील सर्व सदस्यांशी चर्चा करून व गटातील प्रत्येक व्यक्तीच्या मताचा आदर करून, ती समस्या सोडवणारा पर्याय शोधून काढला जातो व तो पर्याय व्यवस्थापनाला सादर करण्यात येतो. व्यवस्थापन सुद्धा या पर्यायाकडे सकारात्मक दृष्टिने समस्येवरील पर्याय अंमलात आणण्यास मान्यता देतो. या क्वॉलिटी सर्कलमध्ये किमान ६ तर कमाल १५ जणांचा गट असू शकतो. कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त कार्यगटाकडून सभा घेतल्या जातात, सभेचे नियम पाळले जातात व सखोलपणे विचारमंथन केले जाते. व्यवस्थापन अशा उपक्रमांना सर्वोतपरी मदत करते. याबाबत आपण कोठे आहोत, याचे सिंहावलोकन करून, आत्मपरीक्षण करणे गरजेचे असून आपल्यातील त्रुटी दूर होणे अपेक्षित आहे.

पुणे महानगरपालिकेत मा.आयुक्त यांच्या सुचनेनुसार व प्रोत्साहनामुळे मनपाच्या स्थापत्य विभागाकडील अभियंता सेवकांमध्ये क्वॉलिटी सर्कलचे काही अंशी काम सुरू झाले आहे.

प्रत्येक संस्थेमध्ये निरनिराळ्या हुद्यांची अधिकार परंपरा (हायरार्की) अस्तित्वात असते. या कार्यव्यवस्थेमुळे सर्वोच्च पातळीवरील अधिकाऱ्यास अनेकांना पूर्ण सेवा काळात, अगदी संस्थेच्या कार्याबाबतचे प्रश्नासाठी सुद्धा भेटण्याची संधी मिळत नाही. क्वॉलिटी सर्कल मधील गट कार्यामुळे निरनिराळ्या हुद्यांचे अधिकारी आणि सामान्य कर्मचारी यांच्यामध्ये अधिकार परंपरा बाजूला ठेवून समन्वयाने दुवा साधला जातो. चर्चेमधून प्रश्नांची उकल होवू शकते याची खात्री पटल्यामुळे कोणतीही अडचण किंवा वाद विकोपाला जात नाही. सर्वसाधारणपणे संस्थेत वर्षानुवर्षे तेच काम करताना कंटाळवाणे होते. नवीन काही शिकून कौशल्य प्राप्त करावे वा आत्मसात करावे ही व्यक्तिमधील जिज्ञासा व पर्यायाने उर्मीच नष्ट होते. क्वॉलिटी सर्कलमुळे काही नवीन करण्याची संधी मिळते व सर्वजण सतर्क, दक्ष व कार्यरत राहतात.

क्वॉलिटी सर्कलचे माध्यमातून व्यक्तीची स्वत:ची, परस्परांची, गटाची, समाजाची प्रगती, गुणवत्ता/दर्जा यामध्ये वाढ व सुधारणा होवून संवाद व सकारात्मक प्रवृत्ती यामध्ये वाढ होते. काम केल्याचे समाधान, खर्चामध्ये बचत, उत्पादकतेत वाढ, सुरक्षिततेमध्ये सुधारणा, प्रश्न सोडविण्याची कुवत, सांघिक भावना व सर्व पातळीवरील हुद्दांवरील व्यक्तिंचे सुसूत्रीकरण इ.बाबी साध्य होतात. क्वॉलिटी सर्कलद्वारे संस्थेचाच फायदा होतो असे नाही, यातून व्यक्तीचा वैयक्तिक निश्चित फायदा होतो. वक्तृत्व, नेतृत्व, समस्या निवारण क्षमता, मित्रपरिवारात इ. अन्य लाभ होतात. याशिवाय व्यक्तिमत्व विकास, नवीन तंत्रे शिकण्याची संधी, आनंदी, उत्साही जीवनशैली, दुसऱ्यांना मदत करण्याची प्रवृत्ती आणि अंतिमत: समाधान व सन्मान मिळून त्यास सामाजिक मान्यता मिळते.

मी जे करू शकत नाही ते आपण करू शकतो, अशी सांघिक भावना क्वॉलिटी सर्कलमुळे जोपासली जाते.क्वॉलिटी सर्कलमुळे कामकाजात सातत्याने सुधारणा होत गेल्याने पुणेकर नागरिकांना पुणे महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या नागरी सुविधांचा दर्जा व वक्तशीरपणा याबद्दल विश्वास निर्माण होवून परिणामी तक्रारींचे प्रमाण निश्चितपणे कमी होईल. त्यामुळे पुणे महानगरपालिकेमध्ये क्वॉलिटी सर्कलचे कार्य जे स्थापत्य विभागात अभियंत्यांच्या कडून प्राथमिक स्तरावर सुरू झाले आहे. त्याचा विस्तार सर्व विभागात सत्वर होवून ते अधिक जोमाने व शास्त्रशुद्ध पद्धतीने स्थायी स्वरूपात सुरुवात करून त्यात कालानुरूप बदल करणेस वा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नजीकच्या काळात निर्माण झाल्यास ती सर्वोत्कृष्ट फलनिष्पत्ती ठरेल.

# मा.श्री.डी.एस.देशपांडे यांचे कामगार क्षेत्रातील प्रदीर्घ व निष्ठापूर्ण योगदान

**मा.डी.एस.देशपांडे, अध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन यांनी कामगार क्षेत्रात प्रदीर्घ असे निष्ठापूर्ण योगदान दिले आहे. त्यासंदर्भात त्यांचे मनोगत जाणून घेण्यासाठी श्री.लीलाधर वाबळे, कार्यकारी संपादक,कल्याणवार्ता यांनी संवाद साधला होता. त्या संवादातून मा.देशपांडे यांच्या कार्याबद्दलचा संक्षिप्त परिचय वाचकांना करून देण्याचा येत आहे.- संपादक**

पुणे महानगरपालिके मधील मान्यताप्राप्त संघटनेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले मा.श्री.डी.एस.देशपांडे यांच्या कामगार क्षेत्रातील कारकिर्दीबाबत मुलाखत घेण्यात आली. मुलाखतीदरम्यान त्यांनी कामगार क्षेत्रात केलेल्या कार्याचा उलगडा होवू शकला. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये या संघटनेची विशिष्ट उद्देशाने स्थापना झाली. मा. अप्पासाहेब भोसले आल्यानंतर सर्व खात्यांमध्ये कनिष्ठ श्रेणीपासून वरिष्ठ श्रेणीतील सेवकांपर्यंत ऐक्याचे वातावरण निर्माण केले. पुणे मनपा कामगार युनियनच्या सक्रीय व दूरदर्शी धोरणामुळे महानगरपालिकेमध्ये तिचे वेगळे स्थान आहे. मनपातील विविध कामगार/सेवक संघटनांचा विविध लढ्यांच्या वेळी या युनियनच्या नेतृत्वाला पाठिंबा देवून संयुक्त लढे दिलेले आहेत, कामगारांच्या न्याय हक्काला प्रतिसाद मिळून, त्यांच्या प्रश्नांची यथोचित सोडवणूक केलेली आहे. या लढ्यांमध्ये केंद्रीय दराने मनपा सेवकांना महागाई भत्ता, सानुग्रह अनुदान, वेतन आयोग, विविध करार इत्यादी मागण्यासांठी झालेल्या लढ्यांचा उल्लेख करता येईल.

श्री. देशपांडे यांचा जन्म १७ डिसेंबर,१९२६ रोजी मुंबई येथे झाला. आज वयाच्या ८२ व्या वर्षी त्यांची कामगारांप्रती असलेली तळमळ व कार्यावर असलेली निष्ठा अनुकरणीय आहे. शालेय शिक्षणामध्ये त्यांना कधी फारशा संधीचा लाभ घेता आला नाही. परंतु परिश्रमपूर्वक १९४५ मध्ये मॅट्रिक परीक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त करुन उत्तीर्ण झाले. त्यावेळच्या ब्रिटीश राजवटीमध्ये मॅट्रिक परीक्षेचा निर्णय १३% लागलेला होता. ते लहान असताना राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत सक्रीय असणाऱ्या त्यांच्या वडिलांचे सन १९३९ मध्ये दु:खद निधन झाल्यामुळे त्यांचे पालकत्व मोठ्या भावावर येवून पडले. परंतु श्री. देशपांडे यांचा स्वाभिमानी स्वभाव व स्वतंत्र वृत्ती त्यामुळे त्यांना आपला भार कोणावर पडू नये, अशी इच्छा होती. त्यांनी लहानमोठ्या अनेक नोकऱ्या केल्या व ४ जानेवारी, १९४९ मध्ये मुंबई महानगरपालिकेमध्ये क्लार्कची नोकरी स्विकारली. तत्पूर्वी छबीलदास हायस्कूलमध्ये काही वर्षे शिक्षक म्हणून काम केले. विद्यार्थी चळवळीत व आंदोलनामध्ये त्यांनी

**संवादक - लीलाधर वाबळे**

सुरुवातीच्या काळात भाग घेतला होता. काही वर्षे राष्ट्रसेवा दलामध्ये त्यांनी कार्य केले होते. त्यावेळेला मा.एस.एम.जोशी आदरणीय सानेगुरुजी इ.नेत्यांचा त्यांना सहवास घडला होता. मुंबईतील कापड उद्योगातील कामगार चळवळीत श्री. देशपांडे यांना कामगार कायद्याचा श्रीगणेशा करता आला. प्रत्यक्ष बार कौन्सिलची सनद न घेतलेले परंतु अनेकवर्षे औद्योगिक कामगार न्यायालयात कामगार प्रतिनिधी म्हणून काम केले आहे. विविध कामगार क्षेत्रातील कामे करताकरता १९६९ मध्ये पुणे मनपा कामगार युनियन व सर्व श्रमिक संघटना या संघटनामध्ये त्यांनी काम केले. त्यांनी जॉईंट सेक्रेटरी, सेक्रेटरी, सल्लागार, उपाध्यक्ष अशा अनेक पदांवर कामे केली व सध्या गेली १० वर्षे ते पुणे मनपा कामगार युनियनचे अध्यक्ष आहेत. एखाद्या प्रश्नाच्या मुळापर्यंत जाण्याची वृत्ती, कामगार कायद्याच्या सखोल अभ्यासाची धडपड, कामगारांवरील अन्यायाविरुध्द लढण्याची मनस्वी कळकळ व प्रत्येक प्रश्न यशस्वीपणे सोडवण्यासाठी कठोर परिश्रमाची तयारी या गुणांमुळे त्यांची युनियनमधील कारकीर्द आदर्शवत ठरली आहे.

आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये समाजवादी रशियाचे विसर्जन झाल्यानंतर जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण ही त्रिसूत्री नवीन आर्थिक धोरणाच्या नावाखाली तत्कालीन राजयकर्त्यांनी भारतामध्ये स्विकारली . त्याचा परिणाम सार्वजनिक क्षेत्रावर पडत गेला. तो आजपर्यंत चालूच आहे. कामगारांचे जीवनमान उंचावणे आजही आवश्यक आहे. त्यांच्या प्राथमिक गरजा, अन्न, वस्त्र व निवारा या अद्याप पूर्ण होणे आहे. समाजामध्ये श्रीमंत व गरीब यांच्यातली दरी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. सार्वजनिक उपक्रम कमकुवत केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर शासन व प्रशासन यांचा दृष्टिकोन अधिक जनताभिमुख व परिस्थितीचा सखोल अभ्यास करण्याची जाणीव प्रशासनात असणे ही काळाची गरज आहे. असे विचार मुलाखतीच्या दरम्यान मा. श्री. देशपांडे यांनी सौदाहरण व सविस्तरपणे व्यक्त केले.

मा.देशपांडे यांनी त्यांच्या मुलाखतमध्ये त्यांच्या प्रदीर्घ कामगार चळवळीचे सार वरीलप्रमाणे व्यक्त केले आहे. त्याचे सर्वांनी सद्यपरिस्थितीमध्ये चिंतन व मनन करणे योग्य ठरेल.

●●●

## कामगार कल्याण निधी योजनेंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन

कामगार कल्याण निधी योजनेंतर्गत दिनांक २६ डिसेंबर ते २९ डिसेंबर, ०७ अखेरपर्यंत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेट, व्हॉलिबॉल, कबड्डी, टेबल टेनिस, लांब उडी, १०० मि. धावणे, कॅरम, बुध्दिबळ, कुस्ती, संगीत खुर्ची,थ्रो बॉल, स्लो सायकलिंग, ५० मि. फ्री स्टाईल स्विमिंग या स्पर्धांचे पं. नेहरु स्टेडियम, वैद्य स्टेडियम, सणस मैदान, इत्यादी ठिकाणी आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व अधिकारी व सेवकांनी या स्पर्धात सहभागी व्हावे.

**मनपाच्या पल्स पोलियो मोहिमेचा लाभ घ्या, महत्त्व सांगा, प्रचार व प्रसार करा.**

## मनन आणि चिंतन

यश ही व्यक्तिगत सिद्धता आहे तर अपयश हे व्यापक तत्वज्ञान आहे, अपयशी माणसाचे अनुभवही यशस्वी माणसाएवढेच सत्य असतात आणि उपयुक्तही असतात.

सत्य आणि संभ्रम यांच्या खेळामध्ये नेहमी सत्याचाच विजय होतो असे नाही, कारण कोणते सत्य व कोणता संभ्रम हे सत्य मात्र या खेळात सहभागी होत नाही.

## पुणे मनपाचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव...

... पान १ वरून

विकसित केली. यासाठी खात्यांतर्गत, तसेच आर्किटेक्ट व बिल्डर्स यांचेबरोबर वेळोवेळी चर्चासत्रे, बैठका यांचे आयोजन करण्यात आले परिणामी वरील सुलभ प्रणाली विकसित करणेत आली. सदर प्रणाली अस्तित्वात आल्यानंतर आजपर्यंत अंदाजे ६३०० प्रस्ताव या प्रणालीद्वारे मान्य करण्यात आले असून त्यांचे अंदाजे क्षेत्र ८० लाख चौ.मी.इतकी आहे. यामुळे बांधकाम परवानगी देण्याच्या कामकाजात एकसुत्रिपणा येवून नकाशा मान्यतेचा कालावधी निम्यावर आलेला आहे. या संगणक प्रणालीचे प्रात्यक्षिक पाहण्यासाठी भारतातील अनेक महापालिकांचे प्रतिनिधी पुणे मनपास भेट देवून गेले आहेत. त्यांनी मनपाच्या संगणक प्रणालीची प्रेरणा घेवून त्या धर्तीवर त्यांच्या संस्थेत प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू केले आहे.

आंतरराष्ट्रीयस्तरावर पुण्याचा माहिती तंत्रज्ञानामध्ये जो नावलौकिक प्राप्त झालेला आहे. तो नावलौकिक पुणे महानगरपालिकेने माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आंतरराष्ट्रीयस्तरावर संगणक प्रणालीला प्रथम क्रमांक मिळवून प्राप्त केला आहे. या यशाचे श्रेय मा. नितीन करीर, माजी महापालिका आयुक्त यांच्या प्रेरणेने व मा. नगर अभियंता, श्री. प्रशांत वाघमारे यांच्या नेतृत्वाखालील श्री.विनोद क्षीरसागर व टीममधील अन्य सहकार्यांच्या सांघिक कामगिरीच्या प्रयत्नामुळे हे यश प्राप्त झाले आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

•••

## ध्येयवाक्य व बोधचिन्ह स्पर्धा

पुणे मनपाच्या प्रज्ञावंत व प्रतिभावान कलाकार अधिकारी व सेवक यांचेकडून मनपाच्या कामगार कल्याण निधीसाठी ध्येयवाक्य व बोधचिन्ह स्पर्धा आयोजित केली आहे. याबाबत ऑक्टोबर व नोंव्हेंबर च्या कल्याणवार्ताचे अंकात व परिपत्रकाद्वारे आवश्यक तो तपशील प्रसिद्ध केला आहे.

या स्पर्धेत भाग घेण्याची अंतिम मुदत दिनांक १०/१२/२००७ होती. त्यामध्ये मुदत वाढ करून ती दि.३१/०१/२००८ पर्यंत करण्यात आली आहे. याचा लाभ घेवून सेवकांनी आपले प्रस्ताव सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे लकरात लवकर पाठवावे.

## कामगार नुकसान भरपाई अधिकार सुपूर्ती

मा. स्थायी समिति ठराव क्र. ९९२, दिनांक ३०/१०/०७ अन्वये मृत सेवकांच्या वारसांना कामगार नुकसान भरपाईची रक्कम एका महिन्यात आदा करणेसाठी तसेच, अपघातग्रस्त सेवकांना मनपा सेवा विनियम क्र. १३३ नुसार अनुज्ञेय विशेष असमर्थता रजा मान्य करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदरच्या ठरावान्वये मा. महापालिका आयुक्तांना प्राप्त झालेले अधिकार मा. खातेप्रमुखांना सुपूर्त करण्यास मान्यता मिळाली आहे.

•••

## ओरीसन स्वेट मार्डेन यांच्या विचारांच्या संकलनातून ...

### सेवकांना प्रोत्साहीत करा

कोणत्याही मार्गाने कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांना उत्तेजन दिले पाहिजे. चुका झाल्या तरी फार दोषारोप करून त्यांना सतत ताणू नका. काही कर्मचारी सतत गैरहजर राहतात. गैरहजेरीचे कारण शोधा व तो कर्मचारी उगीचच टंगळमंगळ करीत असेल तरच त्यावर कारवाई करा. सामान्य माणसाच्या जीवनात आनंदाचे प्रसंग फार कमी असतात. कर्मचाऱ्यांच्याही जीवनात आनंदाचे प्रसंग निर्माण करा. याला फारसे द्रव्य लागत नाही. उदा. - वर्षातून एकदा संक्रातीच्या दिवशी तुम्ही कर्मचाऱ्यांना प्रेमाने तिळगूळ देता का ? या लहानशा खर्चात तुम्ही मोठी सद्भावना निर्माण करता.

### गोड शब्दांची जादू

तुम्ही सद्भावना पेरल्यास तुम्हाला सद्भावनेचेच पीक घेता येते. तुमच्या कर्मचाऱ्यांच्या भावनांशी व विचारांशी तुम्ही समरस व्हावयाला हवे. कर्मचाऱ्यांच्या जीवनात थोडे डोकावून पहा. त्याच्या कुटुंबाची परिस्थिती समजावून घ्या. कर्मचाऱ्यांच्या वृद्ध आईबापांचीही दखल घ्या. कर्मचाऱ्यांच्या पगारावर कितीजण अवलंबून आहेत याचाही शोध घ्या. कर्मचाऱ्याच्या कुटुंबाची परिस्थिती कठीण असेल तर तुम्ही द्रव्याचीच मदत केली पाहिजे असे नाही. तुमचे सहानुभूतीचे व धीराचे चार शब्द जादू करू शकतात व ही जादू करायला कसलाही खर्च येत नाही. तुम्ही याप्रमाणे तुमची वर्तुणूक ठेवाल तर तुमचा कर्मचारी तुमचा मित्र बनेल व तुमचा लहान भाऊ होईल आणि तुमचाही फायदा वाढेल.

### उत्साह आणि यश

पृथ्वीवरील माणूस हा प्राणी समुहाने राहतो. म्हणजे समाजात राहतो. समाजाशिवाय एकट्या माणसाच्या आयुष्याला किंमत नाही. तुम्हाला जे ध्येय गाठायचे आहे ते इतर अनेक किंवा शेकडो माणसांच्या सहकार्यानेच गाठता येईल. तुमच्यातील उत्साह इतरांत संक्रमीत केल्याशिवाय तुम्ही तुमच्या ध्येयात यश मिळवू शकणार नाही. समाजातील इतर व्यक्तींना उत्साहित कसे करायचे, त्यांना कार्यप्रवृत्त कसे करायचे हे जर तुम्हाला समजले तर तुम्ही यशस्वी झालाच म्हणून समजा.

•••

### परिवर्तन करणारे सहा उपाय

तुमच्यामधील उत्साह तुमच्या विचारांतून निर्माण होतो. म्हणून परिवर्तन विचारांत केले पाहिजे. उदात्त व ध्येयाच्या विचारासह २४ तास राहिले पाहिजे.

पण विचारात असा बदल करणे सर्वांना शक्य आहे काय?

होय ! ही गोष्ट १०० टक्के शक्य आहे. एक वेळ कृतीत बदल होणार नाही, पण विचारांत बदल कोणालाही करता येतो. तुमच्या विचारात बदल खालील उपायांनी करता येईल.

१. तुमच्या भोवती सर्व माणसे तुमच्या सारखी आहेत. तुम्हाला जर स्वतःविषयी प्रेम वाटत असेल तर तुमच्याभोवती जी काही माणसे आहेत, ती तुम्हाला आवडली पाहिजेत.

२. गरज असेल तेथे तुम्ही मदतीला धावत असाल तर तुमच्या कुटुंबात, मित्रमंडळीत, सर्व परिवारातील आवडती व्यक्ती होऊ शकाल.

३. तुमच्या मनात व अंतरंगात सतत सळसळता उत्साह भरलेला असला पाहिजे.

४. सोपविलेले कोणतेही अवघड किंवा सोपे काम मी पूर्ण करीनच असा आत्मविश्वास तुमच्या मनात निर्माण व्हायला हवा.

५. सर्वांच्या मदतीला धावून जाणे यात तुम्हाला आनंद वाटायला हवा.

६. तुमच्या सर्व परिवारात तुम्ही महत्त्वाचा माणूस व्हायला पाहिजे.

## कामगार प्रशिक्षण वर्गाची शैक्षणिक सहल प्रथमच विमानातून ...

... पान १ वरून



कामगार प्रशिक्षण वर्गाच्या शैक्षणिक सहलीला लोहगाव विमानतळावर मा. श्री.नंदकिशोर जगताप, सल्लागार कामगार, प्रशिक्षणार्थींना निरोप देताना, समवेत श्री. अरुण खिलारी, श्री. तुकाराम जगताप, प्रशिक्षणार्थी व अन्य सेवक

मनपाचे प्रतिनिधी म्हणून या सहलीत अन्य शहरांना भेटी देणार आहात. त्या भेटीमध्ये पुणे शहराचा व पुणे मनपाचा नावलौकिक वाढेल या पद्धतीने तुमचे आचरण असू देत असे स्पष्ट केले.

सदरच्या शैक्षणिक सहली दरम्यान बेंगलोर, म्हैसूर, मदुराई व त्रिवेंद्रम या चार महापालिकांना भेटी देण्यात आल्या. या भेटीच्या दरम्यान महापालिकेतर्फे राबविण्यात येणारे विविध वैशिष्टचपूर्ण प्रकल्प, महापालिकांचे दैनंदिन कामकाज, नागरी सुविधा पुरविण्याबाबत करण्यात आलेले नवीन व अद्ययावत उपक्रम व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना यांची सविस्तर माहिती संबंधित अधिकारी/पदाधिकारी यांचेशी सुसंवाद साधून घेतली. या भेटीच्या दरम्यान वरील चार महानगरपालिकेतील अधिकारी/पदाधिकारी यांनी प्रशिक्षणार्थींचे स्वागत व आदरातिथ्य करून संबंधित महापालिकेची विविध माहिती प्रशिक्षणार्थींना दिली.बेंगलोर महापालिकेस दिनांक ३०/११/०७ रोजी दिलेल्या भेटीमध्ये मा.श्री.एस.टी.अंजनकुमार, सह आयुक्त (कल्याण) यांनी, म्हैसूर महापालिकेस दिनांक ०१/१२/२००७ रोजी दिलेल्या भेटीमध्ये मा.श्री.प्रभाकर बी. हमीगी, अधिक्षक अभियंता, कु.शफीनाझ व श्रीमती गिरीजाम्मा, पर्यावरण अभियंता यांनी, मदुराई महापालिकेस दिनांक ०३/१२/२००७ रोजी दिलेल्या भेटीमध्ये मा.श्री.रामचंद्रन, उप आयुक्त, श्री.ए.मधुरम,कार्यकारी अभियंता, श्री.एल.के.मुरलीधरन,विभागीय प्रकल्प अधिकारी, श्री.के.सर्वनन्,अन्न व आरोग्य निरिक्षक यांनी आणि त्रिवेंद्रम महापालिकेस दिनांक ०६/१२/२००७ रोजी दिलेल्या भेटीमध्ये मा.श्री.पी.राजेंद्रदास अध्यक्ष,स्थायी समिती(कल्याण), श्रीमती व्ही.जी.सोसम्मा,उपसचिव व डॉ.डी.श्रीकुमार,आरोग्य अधिकारी यांनी प्रशिक्षणार्थींचे स्वागत व आदरातिथ्य करून खेळीमेळीच्या वातावरणात संबंधित महापालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची व मनपाच्या कामकाज पद्धतीची माहिती दिली. पुणे मनपातर्फे शैक्षणिक सहलीचे समन्वयक तथा कामगार कल्याणाधिकारी श्री.खिलारी यांनी प्रत्येक मनपाच्या भेटीच्या वेळी सर्वांचे आभार मानून समयोचित मनोगत व्यक्त केले.

या प्रशिक्षण वर्गासाठी व शैक्षणिक सहलीच्या आयोजनामध्ये समन्वयक,वर्गशिक्षक, पंचकमिटी सदस्य यांनी वेळोवेळी विशेष मदत केली आहे. तसेच श्री. शिवाजी दौंडकर यांनी प्रशिक्षण वर्गासाठी सहकार्य व मदत केली व विशेषत: या सहलीमध्ये वर्गप्रतिनिधी श्री.विजय शहा, श्री.धनंजय खामकर, श्री.अशोक शिरसाट, श्रीमती तनुजा रावळ यांनी उत्स्फुर्तपणे प्रत्येकवेळी सहकार्य केल्याने सहल यशस्वी होवू शकली. या सर्व शैक्षणिक उपक्रमाच्या मागे मा.सल्लागार (कामगार) श्री.नंदकिशोर जगताप यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे प्रशिक्षणार्थींना उत्तम प्रकारचे प्रशिक्षण व शैक्षणिक सहलीचा मनापासून अनुभव व आनंद घेता आला.

•••

# नोव्हेंबर सेवापूर्ती समारंभ



कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मा. सौ. ज्योत्स्ना सरदेशपांडे, सभासद, पुणे मनपा यांचेसमवेत मा. नंदकिशोर जगताप, श्री. शिवाजी दौंडकर, श्री. तुकाराम जगताप, श्री. जयवंत शिंदे व सेवापूर्ती झालेले सेवक.

नोव्हेंबर २००७ मध्ये मनपाच्या सेवेची पूर्ती केलेले एकूण २१ सेवक होते. त्यामध्ये वयपरत्वे १७ व ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतलेले ४ सेवक होते. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सौ.जोत्स्ना सरदेशपांडे, सदस्या, पुणे मनपा या उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.शिवाजी दौंडकर,कामगार कल्याणाधिकारी यांनी केले. सेवापूर्ती झालेल्या सेवकांना शाल व स्मृतिचिन्ह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देवून गौरविण्यात आले. सेवापूर्ती झालेल्या सेवकांपैकी श्री.मुकुंद गुधाटे व डॉ.श्रीमती थेटे यांनी आपल्या मनोगतातून सत्काराला उत्तर दिले. मा.श्री.नंदकिशोर जगताप यांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने सेवापूर्ती झालेल्या सेवक व त्यांच्या कुटुंबियांना उद्देशून सेवानिवृत्तीनंतरच्या जीवनाबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले. मा.सौ.जोत्स्ना सरदेशपांडे यांनी त्यांच्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने मनाने सेवानिवृत्त होऊ नये. आपल्या हातातील पूंजी इतर नातेवाईकांच्या ताब्यात देवू नये, त्यावर आपले पूर्ण नियंत्रण ठेवून आधारवडाचे काम करताना आपले पांघरुण देवू नये. तथापि त्या पांघरुणाची उब आभाळमायेने द्यावी. तसेच, फुलाप्रमाणे आपल्या कुटुंबियांना आणि समाजाला सतत सुगंधित करत रहावे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमास मा.तुकाराम जगताप,अध्यक्ष पी.एम.सी. एम्प्लॉईस युनियन, सेवापूर्ती झालेल्या सेवकांचे कुटुंबिय व सेवानिवृत्त संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री.शिवाजी दौंडकर यांनी तर आभार प्रदर्शन श्री.जयवंत शिंदे यांनी केले.

# मनपा अधिकारी/सेवकांना

## एका तासात इंग्लिश बोलण्यास शिकविणार

### - प्रा. महादेव कोकाटे

मनपा अधिकारी व सेवकांना एका तासात इंग्लिश बोलण्यास शिकविण्याच्या श्री. महादेव कोकाटे यांच्या योजनेस मा. महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

या योजनेनुसार प्रथम दोन वर्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मंगळवार पेठ येथे दिनांक ४ जानेवारी, ०८ रोजी आयोजित केले आहेत.

पहिला वर्ग श्रेणी ४ साठी असून तो सकाळी ११.३० ते १.३० तर दुसरा वर्ग श्रेणी १ ते ३ साठी दुपारी ३.३० ते ५.३० असा आयोजित केलेला आहे.

प्रत्येक वर्गाच्या प्रशिक्षणार्थींची संख्या ४०० असून या दोन वर्गातून एकूण ८०० मनपा सेवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणाच्या अनुभवाद्वारे मनपाच्या उर्वरीत सेवकांसाठी वर्ग आयोजनाचा निर्णय अलाहिदा घेतला जाणार आहे.

सदरच्या प्रशिक्षण कालावधीसाठी श्री. कोकाटे यांचेकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थीला पुस्तक दिले जाईल. प्रशिक्षण संपल्यानंतर हे पुस्तक सेवकांस उपयुक्त वाटल्यास ते त्यांस खरेदी करता येईल. अन्यथा प्रशिक्षण संपल्यानंतर ते पुस्तक श्री. कोकाटे यांच्याकडे सुस्थितीमध्ये परत करावे लागेल. श्री. कोकाटे यांची तीन पुस्तके प्रशिक्षणाच्या ठिकाणी सवलतीच्या दरात विक्रीसाठी उपलब्ध करून दिली जातील.

या प्रशिक्षणासाठी प्रत्येक खात्याला प्रत्येक वर्गासाठी सेवकांची संख्या निश्चित करुन दिलेली असून सल्लागार कामगार खात्याकडून याबाबतचे परिपत्रक प्रसृत करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती आवश्यक असलयास सल्लागार कामगार खात्याकडील श्री. शिवाजी दौंडकर (दूरध्वनी २५५०१२५२), श्री. अरूण खिलारी (दूरध्वनी २५५०१२५३) व श्री. लीलाधर वाबळे (दूरध्वनी २५५०१२५५) यांच्याशी संपर्क साधावा.

•••

# अविनाश पंढरी यांचे सुयश

चौथी डी.के.उडपी ॲन्ड महाराष्ट्र स्टेट मास्टर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २००७-२००८ प्रौढांसाठी मेंगलोर येथे दिनांक ९ डिसेंबर,२००७ रोजी आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये मनपाच्या कोठी कार्यालयाकडील सिनिअर ग्रेड लेखनिक श्री.अविनाश पंढरी यांनी वय ५० पेक्षा अधिक गटात भाग घेवून १५०० मीटर पळण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक तर ५००० मीटर चालण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. तसेच ठाणे येथे दिनांक २८ ऑक्टोबर,२००७ रोजी आयोजित केलेल्या वेटेरन्स ॲथलेटीक्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या प्रथम वेटेरन्स नॅशनल मिनीथॉन चॅम्पीयनशिपच्या स्पर्धेत पुणे मनपातर्फे भाग घेवून वय ५० पेक्षा अधिक गटात १० किलोमीटर मिनीथॉन स्पर्धेमध्ये भाग घेवून ही स्पर्धा ४८ मिनिटात पूर्ण केली. श्री.पंढरी यांनी प्राप्त केलेल्या वरील यशाप्रित्यर्थ हार्दिक अभिनंदन.


**कल्याणवार्ता**
डिसेंबर, २००७
❖ प्रकाशक तथा अध्यक्ष ❖
कामगार कल्याण निधी
मा. प्रविणसिंह परदेशी
आयुक्त, पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
लीलाधर प्र.वाबळे
समन्वयक, मनुष्यबळ विकास कक्ष तथा कार्यालय अधिक्षक
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
मुद्रणमहर्षि मामाराव दाते मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय, पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap@punecorporation.org
फक्त खाजगी वितरणासाठी
(विनामूल्य)


# कामगार कल्याण निधीचे विविध उपक्रम

कामगार कल्याण निधी नियम २००५ नुसार मा. महापालिका आयुक्त यांनी नियुक्त केलेल्या कार्यकारी समितीमार्फत विविध योजना, उपक्रम व पुरस्काराचे कार्यक्रम आयोजित केले जातात. कामगार कल्याण निधी योजनेंतर्गत दरवर्षी विविध श्रेणीतील २० सेवकांना गुणवंत कामगार पुरस्कार प्रत्येकी रक्कम रु. ११,१११/- दिला जातो. यामध्ये वर्ग १-१, वर्ग २-१, वर्ग ३-५ आणि वर्ग ४-१३ अशी पुरस्काराची विभागणी असते. या पुरस्काराचे वाटप १ मे कामगार दिनाच्या रोजी मान्यवरांकडून केले जाते व त्यासाठी कार्यालय परिपत्रकानुसार मार्च-एप्रिलमध्ये सेवकांनी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक असते. तसेच, एप्रिल-मे मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

या वर्षी क्रिडा विषयक स्पर्धा डिसेंबरमध्ये आयोजित केल्या आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रम एप्रिल-मे मध्ये आयोजित केले जातील. या योजनेंतर्गत मयत सेवक सभासदाला रु. १५,०००/-चे अर्थसहाय्य दिले जाते. याशिवाय शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती, प्रशिक्षण व तदनुषंगिक उपक्रम या योजनेंतर्गत राबविले जातात.

# विज्ञान व तंत्रज्ञानाद्वारे आधुनिकीकरण

दारिद्र्य, रोगराई, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरिती, कर्मकांडाचे प्रस्थ,धार्मिक-आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक पिळवणूक, मानवाधिकार, लोकशाही, सहिष्णुता, शिक्षण, बुद्धीवादी व वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा अभाव इ. दोषांनी युक्त असलेला समाज गतीशून्य व मागासलेला समजला जातो. अशा समाजाची वरील दोषांपासून मुक्तता होणे व समाज गतिशील होऊन त्याची प्रगतीच्या दिशेने वाटचाल होणे या प्रक्रियेला, **आधुनिकीकरण** म्हणतात.

**आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये -**

१. आधुनिकीकरण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

२. आधुनिकीकरणातून प्रगती, विकास सुचित होतो.

३. आधुनिकीकरणाच्या प्रभावाने व्यक्ती व समाज यांच्या जडणघडणीत मुलभूत बदल होतात.

४. बुद्धिवंतांची उपक्रमशिलता व शासनाचा सहभाग यामुळे आधुनिकीकरणाला चालना मिळते.

५. आधुनिकीकरणामध्ये सापेक्षता असते.

**आधुनिकीकरणाला सहाय्यक घटक-**

१. शिक्षण, २. तंत्रज्ञान, ३.बुद्धिवादी व वैज्ञानिक दृष्टीकोन, ४. उदारमतवाद, ५. उपक्रमशिलता, ६. शासनाचा सक्रिय पाठिंबा

# मनन आणि चिंतन

- नावे ठेवणे सोपे पण नाव कमविणे अवघड आहे.
- प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नांचा आनंद अधिक असतो.
- चित्र ही हाताची कृती आहे, पण चरित्र ही मनाची कृती आहे.
- जीवन हे सुखाने भरलेला पेला नसून, ते कर्तव्याने भरावयाचे माप आहे.
- चांगल्या गोष्टी प्रत्येक वेळी लगेचच घडतात असे नाही. अनेकदा त्यासाठी दीर्घकाळ प्रतिक्षा करावी लागते.

# वाचकांसाठी...

- खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
- आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
- अभिप्राय व सूचना द्या.
- नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/कार्यक्रम यांचे फोटोसहित संक्षिप्त वृत्त पाठवा.
- मनपा वेबसाईटवर प्रसिध्द केलेला अंक पहा.
- अंकाबाबत अभिप्राय पाठवा.